दहशतवाद विरोधी पथक, नवी मुंबई युनीट स्थापन करण्यास मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-३५१५/प्र.क्र.२९८/पोल-३

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१७.

<u>वाचा</u> :-

१) गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-३१०९/ ८३६/ प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९.
२) गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-३६०५/प्र.क्र.३ (ब)/ पोल-३, दि.१७.०२.२००६.
३) गृह विभाग शासन निर्णय क्र.एसएसए-१००९/ प्र.क्र.४२५/ विशा-४, दि.१४.०६.२०१०
४) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१,दि.०२.०६.२०१५
५) गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-०३१५/प्र.क्र.२७७/पोल-३, दि.२८.१०.२०१६
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/दविप औ.नाग/७०/२००६, दि.२५.०७.२०१७.

<u>प्रस्तावना</u> :-

दहशतवाद विरोधी पथकाच्या कामाची व्याप्ती तसेच दहशतवाद विरोधी पथक, ठाणे युनीटच्या कार्यक्षेत्रामध्ये ठाणे पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय व कोकण परिक्षेत्रामधील सर्व जिल्ह्यांचा समावेश होतो. दहशतवाद विरोधी पथक, ठाणे युनीटच्या कार्यक्षेत्रातील भौगोलीक परिस्थिती व संवेदनशील ठिकाणे विचारात घेता सदर युनीटचे कार्यक्षेत्र प्रचंड मोठे आहे. सदर युनीटच्या कार्यक्षेत्रामधील भागांचे शहरीकरण झपाट्याने वाढत असून त्यानुषंगाने गुन्हेगारीचे प्रमाण देखील वाढत आहे. नवी मुंबई शहर व परिसरामधील दहशतवादी संघटनांचे हस्तक यांची माहिती घेणे, त्यांच्या विरोधात कारवाई करणे, दहशतवादी तसेच देश विघातक कारवायांना आळा घालणे इत्यादी करीता दहशतवाद विरोधी पथक, ठाणे युनीटचे विभाजन करुन स्वतंत्र नवी मुंबई युनीट निर्माण करण्याची पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्र. ६ येथे नमूद दिनांक २५.०७.२०१७ च्या पत्रान्वये शासनास विनंती केली आहे. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>:-

दहशतवाद विरोधी पथक, ठाणे युनीटचे विभाजन करुन नवी मुंबई येथे दहशतवाद विरोधी पथकाचे नवीन युनीट स्थापन करण्यास व सदर युनीटकरीता अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर मंजुर करण्यात आलेली खालील तक्यात नमूद पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची ३८ पदे स्थानांतरणाने उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदाचे नाव	पदांची संख्या	पदनिर्मिती केलेल्या शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक
१.	पोलीस निरीक्षक	०२	गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-३१०९/ ८३६/ प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९
२.	सहायक पोलीस निरीक्षक	०४	गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-३१०९/ ८३६/ प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९
३.	पोलीस उप निरीक्षक	०६	गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-३१०९/ ८३६/ प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९
४.	सहायक पोलीस उपनिरीक्षक	०१	गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-३६०५/प्र.क्र.३ (ब)/ पोल-३, दि.१७.०२.२००६ गृह विभाग शासन निर्णय क्र.एसएसए-१००९/ प्र.क्र.४२५/ विशा-४, दि.१४.०६.२०१०
५.	पोलीस हवालदार	०३	गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-३६०५/प्र.क्र.३ (ब)/ पोल-३, दि.१७.०२.२००६ गृह विभाग शासन निर्णय क्र.एसएसए-१००९/ प्र.क्र.४२५/ विशा-४, दि.१४.०६.२०१०
६.	पोलीस नाईक	१२	गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-३६०५/प्र.क्र.३ (ब)/ पोल-३, दि.१७.०२.२००६ गृह विभाग शासन निर्णय क्र.एसएसए-१००९/ प्र.क्र.४२५/ विशा-४, दि.१४.०६.२०१०
७.	पोलीस शिपाई	१०	गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-३६०५/प्र.क्र.३ (ब)/ पोल-३, दि.१७.०२.२००६ गृह विभाग शासन निर्णय क्र.एसएसए-१००९/ प्र.क्र.४२५/ विशा-४, दि.१४.०६.२०१०
एकूण		**३८**	

२. दहशतवाद विरोधी पथक, ठाणे युनीटचे विभाजन करुन दहशतवाद विरोधी पथक, नवी मुंबई युनीट निर्माण केल्यानंतर उक्त नमूद दोन्ही युनीटचे कार्यक्षेत्र खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असेल :-

अ.क्र.	दहशतवाद विरोधी पथक युनिटचे नाव	कार्यक्षेत्र
१.	ठाणे युनीट	ठाणे पोलीस आयुक्तालय, कोकण परिक्षेत्रातील ठाणे ग्रामीण व पालघर जिल्हा
२.	नवी मुंबई युनीट	नवी मुंबई पोलीस आयुक्तालय व कोकण परिक्षेत्रामधील रायगड, रत्नागिरी व सिंधुदर्ग जिल्हा

३. उपरोक्त नवनिर्मित दहशतवाद विरोधी पथक, नवी मुंबई युनीटकरीता आवश्यक वाहने व साधनसामग्री ही अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर उपलब्ध संसाधनामधून पुरविण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.०२.०६.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१८१७२२४८८१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dhiraj K Abhang

Digitally signed by Dhiraj K Abhang
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b83edfcbaa0fddb5983e8303bccd9a96ef7cc55853b8b449ff8dc53d69f1618d, cn=Dhiraj K Abhang
Date: 2017.09.18 17:13:09 +05'30'

(धीरज कां. अभंग)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.

५. मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
६. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
११. पोलीस आयुक्त, नवी मुंबई शहर.
१२. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.
१३. पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग.
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५. जिल्हा कोषागार अधिकारी, नवी मुंबई.
१६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
१७. निवड नस्ती, पोल-३.